# <u>बैठकीचे इतिवृत्त.</u>

**दिनांक ४/८/२०११ रोजी मुख्यालय, मुंबई येथे अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ संदर्भात मा. आयुक्त ( अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य ) यांनी बोलावलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.**

***************************

सदर बैठकीस मा. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.रा., मा. सह आयुक्त (दक्षता ) अन्न व औषध प्रशासन, मुंबई, तसेच खालीलप्रमाणे सर्व विभागीय सह आयुक्त, सहायक आयुक्त (अन्न), पर्यवेक्षक (अन्न), मुख्यालयातील अन्न निरीक्षक व महानगरपालिकेचे स्थानिक (आरोग्य) प्राधिकारी व अन्न निरीक्षक उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. ओ.शो. साधवानी | सह आयुक्त (विधी ) |
| २) श्री. अशोक गिरी | सह आयुक्त (बृहन्मुंबई विभाग ) |
| ३) श्री. स. रा. शर्मा | सह आयुक्त ( कोकण विभाग ) ठाणे. |
| ४) श्री. संजय पाटील | सह आयुक्त (पुणे विभाग ) |
| ५) श्री. सुहास चौधरी | सह आयुक्त (नाशिक विभाग ) |
| ६) श्री. अ. ता. निखाडे | सह आयुक्त (नागपूर विभाग ) |
| ७) श्री. स. मा. दलाल | सह आयुक्त (अमरावती विभाग ) |
| ८) श्री. सु. ग. अन्नपुरे, | सहायक आयुक्त (अन्न), ठाणे. |
| ९) श्री. चं. दौ. साळुखे, | सहायक आयुक्त(अन्न), पुणे |
| १०)श्री. सु. स. देशमुख | सहायक आयुक्त (अन्न) बृहन्मुंबई |
| ११) श्री. किशोर गोरे | पर्यवेक्षक (अन्न) ठाणे. |
| १२) श्री. श.रा. केकरे | सहायक आयुक्त (अन्न) नाशिक |
| १३) श्री. न. र. वाकोडे | सहायक आयुक्त (अन्न) अमरावती. |
| १४) श्री. उ. शं. वंजारी | पर्यवेक्षक (अन्न) सिंधुदूर्ग |
| १५) श्री. शि. स. देसाई | पर्यवेक्षक (अन्न) रायगड |
| १६) श्री. रा. चं. रुणवाल | पर्यवेक्षक (अन्न) जालना |
| १७) श्री. कृ. ना. दाभाडे | पर्यवेक्षक (अन्न) धुळे |
| १८) श्री. शै. त्र. आढाव | पर्यवेक्षक (अन्न) बुलढाणा. |
| १९) श्री. एस. के. शेरे | सहायक आयुक्त (अन्न) औरंगाबाद. |
| २०) श्री. जी.बी. गोरे | पर्यवेक्षक (अन्न) नांदेड |
| २१) श्री.जे.पी. अजमेरा | पर्यवेक्षक (अन्न) औरंगाबाद |
| २२) श्री. के. एम. हरुगोळी | स्थानिक (आरोग्य ) प्राधिकारी-२ बृहन्मुंबई महानगरपालिका |
| २३) डॉ. जयंत खंदारे | स्थानिक (आरोग्य ) प्राधिकारी-३ बृहन्मुंबई महानगरपालिका |
| २४) श्री. चं. भा. पवार | सहायक आयुक्त (अन्न) |
| २५) श्री. सं. ता. पतंगे, | अन्न निरीक्षक, ठाणे |
| २६) श्री. सं. मा. देशमुख | पर्यवेक्षक (अन्न) सातारा |

| | |
|---|---|
| २७) श्री. एस. पी. नारागुडे | सहायक आयुक्त (अन्न) नागपूर. |
| २८) श्री. आर.बी. पवार | अन्न निरीक्षक, कराड नगरपरिषद |
| २९) श्री. आर.बी. साळवी | अन्न निरीक्षक, रत्नागिरी नगरपरिषद |
| ३०) श्री. वि.ग. भुजबळराव | पर्यवेक्षक (अन्न), अहमदनगर |
| ३१) श्री. एम.एस. देशपांडे | पर्यवेक्षक (अन्न), यवतमाळ |
| ३२) श्री. पी.डी. गळाकाटू | पर्यवेक्षक (अन्न), लातूर |
| ३३) श्री. डी. एन. मिरजकर | पर्यवेक्षक (अन्न), रत्नागिरी |
| ३४) श्री. पी.एम. राऊत, | पर्यवेक्षक (अन्न), सोलापूर |
| ३५) श्री. मि.दा. शहा | पर्यवेक्षक (अन्न), बीड |
| ३६) श्री. अे.जी. पारधी | पर्यवेक्षक (अन्न), जळगाव |
| ३७) श्री. अे. आर. राठोड | पर्यवेक्षक (अन्न), नाशिक |
| ३८) श्री. डी.के. सावंत | पर्यवेक्षक (अन्न), पुणे. |
| ३९) श्री. सी.डी. राठोड | अन्न निरीक्षक, मुख्यालय |
| ४०) श्री. एस.एम. कोलते | पर्यवेक्षक (अन्न),भंडारा |
| ४१) श्री. एम.सी. पवार | पर्यवेक्षक (अन्न), गडचिरोली |
| ४२) श्री.डी. टी संगत | पर्यवेक्षक (अन्न), वर्धा |
| ४३) श्री. एस.एम. देशमुख | मुख्य अन्न निरीक्षक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| ४४) श्री.जी.बी. चावडा | अन्न निरीक्षक, शिरपूर |
| ४५) श्री. एम.जी. शिंदे | अन्न निरीक्षक कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| ४६) श्री. आर.आर. घाडमोडे | अन्न निरीक्षक, औरंगबाद, महानगरपालिका |
| ४७) श्री. यु.आर. मोहिते | अन्न निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ४८) श्री. आर.व्ही. करडक | अन्न निरीक्षक कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| ४९) श्री. एस.अे. केदार | अन्न निरीक्षक, कोल्हापूर महानगरपालिका |
| ५०) श्री. डी.अे. कारंजखळे | पर्यवेक्षक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| ५१) श्री. एस.व्ही. पडवळ | अन्न निरीक्षक, पुणे महानगरपालिका |
| ५२) श्री. के. बी. जाधव | अन्न निरीक्षक, पुणे महानगरपालिका |
| ५३) श्री.एस.जे. मंडलीक | अन्न निरीक्षक, मालेगाव नगरपालिका |
| ५४) श्री. एस.डी. तोरणे | अन्न निरीक्षक, मनमाड महानगरपालिका |
| ५५) श्री. एस.बी. जानकर | पर्यवेक्षक (अन्न), कोल्हापूर |
| ५६) श्री. एस.एम. वझरकर | अन्न निरीक्षक, मुख्यालय |
| ५७) श्री. जी. व्ही. जगताप | अन्न निरीक्षक,बृहन्मुंबई |
| ५८) श्री. डी. डी. कांबळे | अन्न निरीक्षक, ठाणे महानगरपालिका |
| ५९) श्री.एम. अे. जाधव | अन्न निरीक्षक, मिरा भायंदर महानगरपालिका |
| ६०) श्री. टी. सी. बोराळकर | पर्यवेक्षक (अन्न ), उस्मानाबाद |
| ६१) श्री. व्ही. एम. गुंडा, | पर्यवेक्षक (अन्न ), पुणे महानगरपालिका |

श्री. ग. सु. परळीकर, पर्यवेक्षक (अन्न) अकोला यांनी सदर बैठकीचे सुत्रसंचलन केले. सह आयुक्त (अन्न) मुख्यालय, मुंबई यांनी सदर कायदयाच्या दि. ५/८/२०११ पासून करावयाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाने केलेली तयारी व अधिका-यांचा सहभागाबाबत मार्गदर्शन केले.

मा. सह आयुक्त (दक्षता) यांनी सदर कायदयाची अंमलबजावणी करतांना पार पाडावयाच्या जबाबदारीसह आवश्यक असलेली दक्षता व कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले.

तदनंतर मा. आयुक्तांनी सदर कायदयाच्या मूळ तत्वाबाबत सविस्तर चर्चा करुन अंमलबजावणीच्या जबाबदा-या व नैतिक जबाबदारी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले अंमलबजावणी करत असताना येणा-या अडचणी तात्काळ मुख्यालयास कळविण्यात याव्यात याबद्दल त्यांनी सूचना केल्या. तसेच कायदयाचा मूळ अभिप्रेत अर्थ लक्षात घेवून जास्तीत जास्त अन्न व्यवसायिकांपर्यंत पोहचून त्यांना सदर कायदयाबाबत मार्गदर्शन करावे व त्यासाठी प्रत्येक विभागात कार्यरत असलेल्या "चेंबर ऑफ कॉमर्सची" मदत घ्यावी अशा सूचना दिल्या.

महाराष्ट्र राज्यात अद्याप ब-याच आस्थापना विना परवाना व्यवसाय करीत असून अशा सर्व आस्थापनांपर्यंत पोहचून त्यांना परवाना अथवा नोंदणी करण्याबाबत उदयुक्त करावे अशा सूचनाही मा. आयुक्तांनी दिल्या.

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात नमूना घेण्याचे काम अधिक असूनही भेसळीचे प्रमाण मात्र कमी आहे. ते अधिक प्रमाणात शोधणे आवश्यक असल्याची जाणीवही मा. आयुक्तांनी दिली.

अन्न सुरक्षा अधिकारी यांना GMP व GHP चे प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यानुसार तपासणी करीत असतांना सदर प्रशिक्षणातील ज्ञान त्यावेळी वापरावे असेही त्यांनी सांगितले.

सदर कायदयाच्या अंमलबजावणी कामी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढणेसाठी तसा प्लान तयार करुन अंमलबजावणी करण्याबद्दल त्यांनी सूचना दिल्या.

सदर कायदया अंतर्गत तपासणीसाठी घेतले जाणारे अन्न नमुने घेतानाच सदर विक्रेत्याकडून नमून्याचा चौथा भाग ॲक्रीडेटेड लॅबला पाठविण्याबाबत विनंती व फीस घेण्यात यावी यासंदर्भात केंद्रिय प्राधिकरण अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन घेण्यात येईल असे मा. आयुक्तांनी सांगितले.

..४/--

ॲक्रीडेटेड लॅबची बैठक बोलावण्यात आलेली असून त्यांच्याकडे विश्लेषणासाठी पाठवण्यात येणा-या नमून्यांची फीस किती असेल याबाबत माहिती घेण्यात येत आहे व ती सर्व महाराष्ट्रात सारखीच असेल, याबाबत मा. आयुक्तांनी माहिती दिली.

उपस्थित असलेल्या सर्व विभागातील सह आयुक्त व सहायक आयुक्त (अन्न) यांनी त्यांच्या विभागात झालेल्या तयारीबाबत सदर बैठकीत माहिती दिली.

सह आयुक्त, पुणे विभाग यांनी त्यांच्या विभागात व्यापा-यांच्या कार्यशाळा आयोजित करुन त्यांना कायदयाबद्दल अवगत केल्याचे सांगून कार्यालयातून स्टेशनरी व फॉर्मस देखील तयार असल्याचे सांगितले. त्यांचा विभाग सदर कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

सह आयुक्त (नाशिक) यांनी देखील त्यांच्या विभागातील अधिका-यांमार्फत सदर कायदयाच्या माहितीसाठी सर्व विभागात व्यापा-यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्याचे सांगून इतर तयारी जवळपास पूर्ण झाल्याचे सांगितले.

सहायक आयुक्त (अन्न) अमरावती यांनी देखील त्यांच्या विभागात झालेल्या व्यापा-यांसाठीच्या कार्यशाळा व तयारी बद्दलची माहिती दिली.

सह आयुक्त (अन्न) ठाणे यांनी त्यांच्या विभागात देखील तयारी पूर्ण झाली असून व्यापा-यांच्या कार्यशाळा आयोजनाची माहिती दिली.

सह आयुक्त (औरंगाबाद) यांनी त्यांच्या तयारीबद्दल व कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल माहिती दिली.

सह आयुक्त (नागपूर ) यांनी त्यांच्या विभागातील तयारी व कार्यशाळा आयोजनाची माहिती दिली.

तदनंतर डॉ. श्री. मेथेकर यांनी सदर कायदयातील मुख्य तरतुदी व त्याचा अभिप्रेत अर्थ तसेच परिणामकारक अंमलबजावणी याबाबत संगणकीय सादरीकरण (Presentation ) केले.

..५/--

सदर बैठकीच्या शेवटच्या सत्रात उपस्थित अधिका-यांपैकी श्री. संगतसाहेब, पर्यवेक्षक (अन्न) वर्धा यांनी जुन्या पेपरस्लीप वापराव्यात किंवा कसे याबद्दल विचारले असता सह आयुक्त (अन्न) यांनी त्या वापरु नयेत असे सांगितले. तसेच सप्लायर नोटीस फॉर्मेट व चौथा भाग तपासणीसाठी पाठवावयाच्या पत्राचे फॉरमेट लवकर कळविण्यात यावे, अशी विनंती श्री. संगतसाहेब यांनी केली. सदर फॉर्मेट त्यांनाच तयार करण्याच्या सूचनाही मा. सह आयुक्त (अन्न) यांनी दिल्या.

श्री. थूल साहेब, सह आयुक्त ( औरंगाबाद ) यांनी भेसळीचे प्रमाण (परसेंटेज ) कमी वाटण्याचे कारण नमूने जास्त असून इतर राज्यात नमून्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे भेसळीचे प्रमाण जास्ती वाटत असल्याचे सांगितले. परवाना व नोंदणीबाबत संगणकीकरणाचा ( सॉफ्टवेअर) तयार करण्यासाठी जबाबदारी घेतली.

श्री. चौधरी साहेब सह आयुक्त (नाशिक ) यांनी या कायदयाच्या अंमलबजावणीवेळी येणा-या अडचणी व आवश्यक मार्गदर्शनासाठी एक कॉमन इमेल आयडी असावा, अशी सूचना दिली. मा. आयुक्तांनी सध्या कार्यरत असलेल्या वेबसाइटवर असलेल्या इमेलचा वापर करावा असे सांगितले.

श्री. निखाडे, सह आयुक्त ( नागपूर ) यांनी ड्रग डिपार्टमेंटच्या धरतीवर या कायदयाच्या अंमलबजावणी वेळी करावयाच्या तपासणीसाठी दुकानदाराकडे इन्स्पेक्शन बूक ठेवण्यात यावे. ज्यामुळे नंतर तपासणीसाठी येणा-या अधिका-यास पूर्वीच्या तपासणी नोंदी कळतील अशी सूचना केली.

श्री. खंदारे, स्थानिक आरोग्य प्राधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. ५/८/२०११ नंतर MOH कसे काम करतील असे विचारले असता श्री. जी.एच. राठोड, सह आयुक्त (अन्न) यांनी FDA मधील D.O. हे दि. ५/८/२०११ पासून कार्यरत होणार असल्यामुळे MOH LHA कॉर्पोरेशन काम संपणार असल्याचे त्यांना सांगितले.

यापुढे नविन कायदया अंतर्गत अन्न नमुन्यांचा इष्टांक अन्न सुरक्षा अधिकारी यांनी प्रतिमहीना ५ नमूने व १० तपासणी कराव्यात. तसेच नमूना सिल करण्यासाठी लागणारे सील नविन सिल तयार होईपर्यंत त्यांचेकडे असलेले पूर्वीचेच सिल वापरावे असेही मा. सह आयुक्त (अन्न) यांनी सांगितले.

श्री. सुनिल देशमूख, अन्न निरीक्षक KDMC यांनी महानगरपालिकेतील अन्न निरीक्षकांना प्रस्तावित कयदयाच्या अंमलबजावणीसाठी या प्रशासनात समाविष्ठ करुन घेणार किंवा कसे याबद्दल प्रश्न उपस्थित केला असता याबाबतचा प्रस्ताव नागरी विकास खात्याकडे पाठवण्याबाबत प्रशासनातर्फे व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे पत्र पाठविण्यात आले असून पाठपूरावा सुरु असल्याचे श्री.राठोड, सह आयुक्त (अन्न) यांनी सांगितले.

आभार प्रदर्शनाअंती सदर बैठक संपली.